दुरध्वनी क्र. : २६४७ ४२११ विस्तारित ३६४२ दूरभाष क्र. : ०२२-२६५८ १५१६.
२रा माळा, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

**संदर्भ :** मा.सं/जनसंपर्क/प्रेस नोट/३६

## पत्रकार टिपणी

### महानिर्मितीची पाचवी आंतर विद्युत निर्मिती केंद्र नाट्यस्पर्धेचे उद्‌घाटन दि. २३ नोव्हेंबर रोजी

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती) च्या सांघिक कार्यालय, मुंबई व उरण वायू विद्युत केंद्र द्वारे पाचवी आंतर विद्युत निर्मिती केंद्र नाट्यस्पर्धा यशवंत नाट्यमंदिर माटुंगा, मुंबई येथे आयोजित केली आहे. सदर नाट्यस्पर्धा दि. २३ ते २७ नोव्हेंबर या काळात संपन्न होणार आहे. अहोरात्र वीजनिर्मितीत मग्न असणाऱ्या वीज कर्मचाऱ्यांमधील नाट्यगुणांना वाव देण्यासाठी हा कल्याणकारी उपक्रम राबविला जात असून या स्पर्धेचा दर्जा नेहमीच उत्तम राहिलेला आहे.

सदर नाट्यस्पर्धेचा उद्‌घाटन समारंभ सोमवार दि. २३ नोव्हेंबर २००९ रोजी सकाळी ९.१५ वा संपन्न होणार आहे. या उद्‌घाटन समारंभाच्या अध्यक्ष स्थानी श्री. गुलाबसिंग गिरासे - संचालक (वित्त), महानिर्मिती, मुंबई तसेच उद्‌घाटक श्री. चंद्रकांत थोटवे - संचालक (प्रकल्प), महानिर्मिती, मुंबई हे आहेत. या नाट्यस्पर्धेला श्री. अरविंद चौधरी – कार्यकारी संचालक (मानव संसाधन), श्री. विजय सिंह – कार्यकारी संचालक (सं. व सु.), व श्री. एम.जी. वाघमोडे – कार्यकारी संचालक (सांघिक नियोजन) विशेष उपस्थिती म्हणून लाभणार आहे.

तसेच सदर नाट्यस्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ शुक्रवार दि. २७ नोव्हेंबर २००९ रोजी दुपारी ३.३० वा संपन्न होणार आहे. या पारितोषिक वितरण समारंभाच्या अध्यक्ष स्थानी श्री. सुब्रत रथो – व्यवस्थापकीय संचालक (भा.प्र.से.), महानिर्मिती असणार आहेत. तसेच श्री. मधुकर शेलार – संचालक (संचलन), श्री. चंद्रकांत थोटवे - संचालक (प्रकल्प), श्री. अरुण डवलेकर - कार्यकारी संचालक (प्रकल्प – २) यांचीही उपस्थिती लाभणार आहे. विशेष अतिथी म्हणून सुप्रसिध्द नाट्य दिग्दर्शक श्री. पुरुषोत्तम बेर्डे उपस्थित राहणार आहेत.

नाट्यस्पर्धेचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे – (१) जोगीया (मुख्यालय व उरण वायू विद्युत केंद्र) दि. २३ नोंव्हेंबर रोजी सकाळी १०.०० वा. (२) उत्तररात्र (भुसावळ औ.वि. केंद्र) दि. २३ नोंव्हेंबर रोजी दुपारी ३.०० वा. (३) माकडाच्या हाती शँपेन (नाशिक औ.वि. केंद्र) दि. २४ नोंव्हेंबर रोजी सकाळी १०.०० वा. (४) पूर्णविराम (परळी औ.वि. केंद्र) दि. २४ नोंव्हेंबर रोजी दुपारी ३.०० वा. (५) खजिन्याची विहीर (पोफळी जल विद्युत केंद्र) दि. २५ नोंव्हेंबर रोजी सकाळी १०.०० वा. (६) अधांतर (चंद्रपूर महाऔ.वि. केंद्र) दि. २५ नोंव्हेंबर रोजी दुपारी ३.०० वा. (७) कळा या लागल्या जीवा (कोराडी औ.वि. केंद्र) दि. २६ नोंव्हेंबर रोजी सकाळी १०.०० वा. (८) अग्निदिव्य (खापरखेडा औ.वि. केंद्र) दि. २६ नोंव्हेंबर रोजी दुपारी ३.०० वा. (९) नवसाचं बोकड (पारस औ.वि. केंद्र) दि. २७ नोंव्हेंबर रोजी सकाळी १०.००वा.

वरील सर्व कार्यक्रम तसेच सर्व नाट्यप्रयोग विनामुल्य असून सर्व नाट्यरसिकांसाठी खुले आहेत, असे महानिर्मितीतर्फे कळविण्यात येत आहे.

---

दिनांक : २०/११/२००९.

प्रति,
**माननीय संपादक,**
दैनिक

आदरणीय महोदय,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**